-: अटी व शर्ती :-

१) ग्रामीण रुग्णालय कुही जिल्हा नागपूर यांचे कार्यालयात दिनांक ०९.११.२०२६ ते २०.११.२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेच्या आत शासकीय सुटटी सोडून सादर करावेत.

२) सदरील दरपत्रक मोहरबंद लिफाप्यामध्ये सादर करण्यात यावेत.सदरील लिफाप्यावर उपकरणे व जडवस्तू संग्रह खरेदीकरिता दरपत्रके असे ठळकपणे नमूद करण्यात यावे.

३) विहित मुदतीत प्राप्त झालेलीच दरपत्रके स्विकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४) सदरील नमूद दरामध्ये खोडाखोड अथवा अंक गिरवले नसावे अन्यथा सदर दरपत्रक बाद करण्यात येईल.

५) सदरील दरपत्रक वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय कुही जिल्हा नागपूर यांचे दालनात दिनांक २३.११.२०२६ रोजी उघडण्यात येईल.

६) खरेदीधारकास शासकिय कामाचा अनूभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

७) सदर उपकरणे व जडवस्तू संग्रह ७ दिवसाच्या आत उचल करणे बंधनकारक राहील व सदर उपकरणे व जडवस्तू संग्रह उचल करण्याची जबाबदारी खरेदीधारकाची राहील.याकरिता कुठलाही वाहतूक भत्ता,कुरीयर किंवा इतर भाडे या कार्यालयामार्फत अदा करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

८) दरपत्रकांना प्रतिसाद न मिळाल्यास अथवा त्यामध्ये त्रुटी आढळल्यास ही दरपत्रके स्विकारणे,नाकारणे अथवा रदद करणे इ.अधिकार वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय कुही जिल्हा नागपूर यांना राहतील.

वैद्यकीय अधीक्षक
ग्रामीण रुग्णालय कुही ,नागपूर

Scanned with OKEN Scanner

सार्वजनिक आरोग्य विभाग

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

आरोग्य सेवा

NATIONAL HEALTH MISSION MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

ग्रामीण रुग्णालय, कुही जिल्हा नागपूर (महा.) ४४१ २०२

दुरध्वनी क्रमांक : ०७१०० - २९९६०२

E-mail : morhkuhi77@gmail.com

जा.क्र.ग्रारुकु/ निर्लेखित उपकरणे/ 1106 /२६

कार्यालय :-वैद्यकीय अधिक्षक,
ग्रामीण रुग्णालय, कुही जिल्हा नागपूर ४४१२०२

दिनांक :-04/11/2026

-: दरपत्रक सुचना :-

सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत ग्रामीण रुग्णालय कुही , नागपूर येथिल निर्लेखित केलेली उपकरणे जडसंग्रह वस्तू यांची विक्री करिता इच्छूक नोंदणीकृत प्रतिष्ठांणांकडून सिलबंद लिफाप्यात दरपत्रके मागविण्यात येत आहेत.दरपत्रक मागविण्याचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

दरपत्रक कार्यवाही वेळापत्रक

Sr.No.	Activity	Date / Period
	Sale Of Quotation (Free Of Cost)	०९/११/२०२६
	Date Of Submitting Quotation	२०/११/२०२६
	Last Date Of Submitting Quotation	२०/११/२०२६
	Quotation Opening	२३/११/२०२६
	Query Discusion if any	२५/११/२०२६

सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत ग्रामीण रुग्णालय कुही, जिल्हा नागपूर येथिल विक्री करावयाच्या निर्लेखित उपकरणे जडसंग्रह वस्तू यांचा तपशिल ईच्छूक नोंदणीकृत प्रतिष्ठाणांनी आपले प्रतिष्ठाणाचे दरपत्रके पात्रतेसाठी खालीलप्रमाणे प्रमाणपत्र / कागदपत्रे सादर करणे अनिवार्य राहील.

१) Shop Act रजिस्ट्रेशन ची प्रत (गुमास्ता नोंदणी प्रमाणपत्र)
२) Pan Card ची प्रत (पॅन कार्ड)
३) GST Registration Certificate (जिएसटी नोंदणी प्रमाणपत्र)
४) Quotation On Firms Letterhead (प्रतिष्ठाणचे लेटर हेडवर दरपत्रक)

सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत ग्रामीण रुग्णालय कुही , नागपूर येथिल वैद्यंकीय अधीक्षक यांना दरपत्रकातील कोणत्याही बाबींची संख्या कमी जास्त करण्याचे आणी कोणतेही कारण न देता दरपत्रक नाकारण्याचे / वेळापत्रकात बदल करण्याचे / संपूर्ण प्रक्रीया रदद करण्याचे सर्व अधिकार स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

वैद्यकीय अधीक्षक
ग्रामीण रुग्णालय कुही ,नागपूर

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन
आरोग्य सेवा
ग्रामीण रुग्णालय, कुही जिल्हा नागपूर (महा.) ४४१ २०२

दुरध्वनी क्रमांक : ०७१०० - २९९६०२
E-mail : morhkuhi77@gmail.com

जा.क्र.ग्रारुकु/ निर्लेखित उपकरणे/ 1102 /२६
कार्यालय :-वैद्यकीय अधिक्षक,
ग्रामीण रुग्णालय, कुही जिल्हा नागपूर ४४१२०२
दिनांक :- 04/11/26

विक्री फॉर्म नमुना

विषय :- ग्रामीण रुग्णालय कुही, जिल्हा नागपुर येथील अंतिम निर्लेखीत उपकरणे आणि जडवस्तू यांची विक्री करणे बाबत.

संदर्भ :- या कार्यालयाची उपकरणे आणि जडवस्तू यांची विक्री बाबत एन.एच.एम वेबसाईटवरील प्रसिध्द जाहिरात - दि.०९/११/२०२६

कार्यालयातील उपकरणे आणि जडवस्तू यांची विक्री पुढील प्रमाणे अटी व शर्तीच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

१) विक्री करावयाच्या वस्तू आपणास ग्रामीण रुग्णालय कुही , नागपुर येथे कार्यालयीन दि. ०९/११/२०२६ ते २०/११/२०२६ या कालावधीत पाहता येतील.

२) वस्तू जशा स्थिती आहेत तश्या स्थितीमध्ये विक्री करावयाच्या आहेत.

३) विक्री फॉर्म निशुल्क आहे . ठेकेदारास , ग्रामीण रुग्णालय कुही जिल्हा नागपुर येथून निवीदा फॉर्म प्राप्त करावा लागेल आणि त्या अधिकृत फॉर्मवरच "उपकरणे विक्री बाबतचा लखोटा" असे नमुद करुन सिलबंद लखोटा जाहीरातील नमुद अंतिम तारखे पुर्वी दि. २०/११/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत या कार्यालयात सादर करावा लागेल.

४) वेळे नंतर अथवा उशिरा आलेले लखोटे स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

५) अधिकृत फॉर्म निशुल्क आहे .

६) अधिकृत फॉर्म सादर न केल्यास आपले दरपत्रक रद्द समजण्यात येईल.

७) संपुर्ण लॉटची किंमत आपणास नमूद करावी लागेल. सदर किंमतीवर आपणास १८ टक्के दराने जी.एस. टी. भरावा लागेल.

८) फॉर्म सोबत १) पॅन कार्ड, जी.एस.टी. प्रमाणपत्र, बॅन्क डिटेल, शॉप ॲक्ट, अनुभव प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे सीलबंद लखोटयात असणे अनिवार्य आहे. सदर कागदपत्रे आपल्या अर्जासोबत जोडली नसतील तर आपला अर्ज रद्द करण्याचे अधिकार वैद्यकीय अधिक्षक यांचे कडे राखून ठेवण्यात्र येत आहेत.

कृ.मा.प.

Scanned with OKEN Scanner

९) आपले दरपत्रक मान्य झ्याल्यास आणि या कार्यालयाचे आदेश आपणास प्राप्त झाल्यास ५ दिवसांच्या आत कार्यालयीन वेळेत शासकीय सुट्टी वगळता एकुण २५ टकके एवढी रक्कम आपणास जमा करावी लागेल. उर्वरीत ७५ टक्के रक्कम आणि जी.एस.टी. १८ टक्के असे एकुण रक्कम धनाकर्षाच्या (डिमांड ड्राफट) च्या स्वरुपात यां कार्यालयामध्ये पुढील ५ दिवसामध्ये जमा करावी लागेल. अन्यथा आपला कोणताही अधिकार या लॉटवर राहणार नाही.

१०) कार्यालयीन उपकरणे आणि जडवस्तू आपणास आहे त्या जोगेवरुन कार्यालयास बाब विचारात घेवून स्वखर्चाने घेऊन जावी लागतील.

११) स्विकृत आदेश निर्गमीत झाल्याच्या दिनांका पासून पुढे १५ दिवस पर्यंत कोणतीही कार्यवाही न झाल्यास किंवा लॉट ची उचल १५ दिवसात न केल्यास त्यावर रु.५००/- प्रती दिवस प्रमाणे रक्कम आकारण्यात येईल आणि ३० दिवसांच्या आत साहित्याची उचल न केल्यास आदेश आपोआपच रद्द गृहीत धरुन पुढील जास्त रक्कम धारण केलेल्या कंत्राटदाराच्या नावे आदेश निर्गमीत करण्यात येईल.

१२) धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) हा वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, कुही यांचे नावे तयार करुन घ्यावे.

१३) सदरची निविदा / फॉर्म स्विकारणे, नाकारणे अथवा रद्द करणे या बाबतचे सर्व अधिकार कार्यालय प्रमुख या नात्याने वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय कुही, नागपूर यांनी राखुन ठेवलेले आहेत. ते आपणास बंधनकारक राहतील यांची नोंद घ्यावी.

वैद्यकीय अधीक्षक
ग्रामीण रुग्णालय कुही ,नागपूर

सहमतीपत्र

वरील विक्री फॉर्म मध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून मला मान्य आहेत तसेच विक्री करावयाच्ये उपकरणे व वस्तू मी प्रत्यक्षात बघीतले आहेत. या बाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

भ्रमणध्वनी क्रमांक ..... ई-मेल .....

ठेकेदारचे नाव, सही, शिक्क व दिनांक .....

Scanned with OKEN Scanner